# २. मोत्याचे पीक

- वि. स. खांडेकर

विष्णू सखाराम खांडेकर (१८९८-१९७६)

भारतीय साहित्य विश्वात कादंबरीकार व लेखक म्हणून परिचित. कादबंरी, कथा, रूपककथा, कविता, लघुनिबंध, नाटक, चित्रपटकथा, व्यक्तिचित्रे आणि समीक्षा अशा वैविध्यपूर्ण वाङ्मयप्रकारातून लेखन. मराठी कथावाङ्मयात 'रूपककथा' हा कथाप्रकार रूढ करण्याचे श्रेय खांडेकरांचे आहे. 'दोन मने', 'दोन ध्रुव', 'हृदयाची हाक', 'अमृतवेल', 'ययाति'या कादंबऱ्या. 'विद्युत प्रकाश', 'नवमल्लिका', 'हस्ताचा पाऊस', 'ऊन पाऊस', 'सूर्यकमळे', 'सांजवात' हे कथासंग्रह. 'कलिका', 'मृगजळातल्या कळ्या', 'सुवर्णकळा', 'वेचलेली फुले', 'सोनेरी सावल्या' आणि 'वन देवता' हे रूपककथा संग्रह प्रकाशित आहेत. 'गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय, 'आगरकरः व्यक्ती आणि विचार', 'केशवसुतः काव्य आणि कला' हे समीक्षाग्रंथ. १९४१ मध्ये सोलापूर येथे भरलेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलानाचे अध्यक्ष होते. १९७४ मध्ये त्यांच्या 'ययाति' कादंबरीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. पद्मभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

खांडेकरांनी रूपककथा लेखन करून जीवनवादी संस्कार आणि संदेश दिला. कल्पकता, सूचकता आणि तत्त्वप्रतिपादनाची आवड हे त्यांच्या रूपककथेचे विशेष. भूक आणि दुःख हे मानवी जीवनाचे आदीम तत्त्वे आहेत पण मानवाला याची भ्रांत पडते याची मूलगामी आठवण ही कथा करून देते.

पाणबुड्यांनी वरुणदेवतेची प्रार्थना केली, 'देवा, तू मृगाचा पाऊस आणि मघांचा पाऊस भरपूर पाडतोस. मग लांबट मोत्यांप्रमाणे दिसणारे सुंदर भात तयार होते. तू हस्ताचा पाऊसही खूप पाडतोस. मग गोल मोत्यांच्या दाण्याप्रमाणे दिसणारा सुंदर जोंधळा तयार होतो. पण भात काय, जोंधळा काय, सारेच क्षणभंगुर !

मोत्यांचे पाणी वर्षानुवर्षे टिकते ! 'देवा, यंदा नुसत्या स्वातीचा पाऊस पाड. खूप खूप मोती पिकू देत. गोरगरिबांच्या मुलांच्या कानांत डूल झुलू देत. त्यांच्या बायकांच्या हातांत मोत्यांची काकणे फुलू देत. मंदिरांच्या दारादारावर मोत्यांचे पडदे हलू देत.'

वरुणाच्या पोटात शिरायला पाणबुड्यांना काही कुणी शिकवायला नको ?

आणि वरुणदेवतेचे हृदय काय मुद्दाम द्रववावे लागते ?

भक्तांची विनंती देवतेने आनंदाने मान्य केली.

***

पावसाळा आला. लोक मृगाची अत्यंत उत्कंठेने वाट पाहात होते. पण मृगाची चाहूल त्यांना कुठेच ऐकू येईना !

मधली सारी नक्षत्रेही कोरडी गेली. लोकांच्या तोंडचेच नव्हे तर पृथ्वीच्या पोटातले



Scanned with OKEN Scanner

पाणीही पळून गेले. तृणांकुरांबरोबर आशांकुरही दग्ध होऊ लागले.

मघा आल्या.

लोकांच्या डोळ्यांत प्राण उभे राहिले.

मघा जशा आल्या, तशा गेल्या.

लोकांच्या डोळ्यांतले प्राण तडफडू लागले.

आशा म्हणाली, 'हस्तात पाऊस पडलेच पडेल. उगीच का हत्तीचा पाऊस म्हणतात त्याला ?'

मुसळधार तर नाहीच, पण करंगळीएवढी धारसुद्धा हस्तात पडली नाही. हत्ती दूर राहिला, ससा सुद्धा दिसला नाही! लोकांनी व्याकुळ दृष्टीने आभाळाकडे पाहिले. पण वासरू कितीही हंबरले तरी आटलेली गाय त्याला दूध कुठून देणार ? स्वातीमध्ये मात्र उभ्या वर्षाचा पाऊस कोसळला !

***

समुद्रातले शिंपले हास्यपूर्वक त्या सरीचे स्वागत करीत होते.

सारे पाणबुडेही त्या सरींना 'या या' म्हणत होते.

मात्र शेतकरी रडत होते, व्यापारी कुढत होते, जग भोवळ येऊन पडत होते !

***

पाणबुडे पाण्याबरोबर नाचत आले.

इतके मोत्यांचे शिंपले त्यांना साऱ्या जन्मात मिळाले नव्हते.

श्रमाने आणि आनंदाने ते झोपी गेले. मोती काढण्याचे काम बरोबर आलेले लोक करीतच होते. ते जागे होऊन पाहतात ते समोरुन उंच उंच राशी पडलेल्या ! एकाला वाटले, भाताची रास असेल ही ! दुसऱ्याला वाटले जोंधळ्याची रास असेल ती ! त्यांनी आपल्या डोळ्यांवरून हात फिरविला. प्रत्येकाने अंगाला चिमटा घेऊन पाहिला. कुणीही स्वप्नात नव्हता.

त्यांच्यासमोर पसरलेल्या साऱ्या राशी मोत्यांच्या होत्या. त्या राशी पाहून त्यांची तहानभूक हरपून गेली.

***

पण भुकेची जागा ब्रह्मानंदानेही फार वेळ भरून निघत नाही.

थोड्या वेळाने जो तो तळमळू लागला. प्रत्येकाच्या पोटात कावळे ओरडू लागले होते. बरोबर आणलेली शिदोरी केव्हाच संपून गेली होती !

मोत्यांनी भरलेले हारे डोक्यांवर घेऊन ते लोकवस्तीच्या दिशेने धावू लागले.

दुरून एक झोपडी दिसली त्यांना. आता आपल्याला खायला मिळणार म्हणून जो तो जोराने चालू लागला.

***

त्या शेतकऱ्याच्या दारात एक गाय मोठमोठ्याने हंबरडा फोडून एका निश्चेष्ट वासराला चाटीत होती.

घरातली कारभारीण तिच्या मानेवर मान टाकून तिचे सांत्वन करीत होती.

झोपडीच्या दारात ज्यांच्या बरगड्या न् बरगड्या मोजता येतील अशी तीन

चिल्लीपिल्ली हा देखावा पाहून भांबावून गेली होती.

पहिल्या पाणबुड्याने विचारले, 'काय झालं बाई वासराला?'

'उपासानं मेलं!'

'उपासानं?' एकाने प्रश्न केला.

'चारा खात नव्हंत?' दुसऱ्याने विचारले.

'चारा?' हताशपणाने ती उद्गारली ! क्षणभर थांबून हुंदके देत ती म्हणाली, 'कुठून आणू मी चारा' ?

बाई फार गरीब आहे हे उघडच दिसत होते. आपल्या हाऱ्यातली मूठभर मोत्ये हातात घेऊन त्या पानबुड्यांचा पुढारी पुढे झाला. तिच्या जवळ जाऊन मूठ उघडीत तो म्हणाला, 'साधा चारा कशाला हवा? हा मोत्यांचा चारा घे'!

ती मोत्ये पाहून बाईला मोह पडला. मरून पडलेल्या वासराला ती विसरली. गाईच्या डोळ्यांतून वाहणारे पाणी त्या मोत्यांच्या पाण्यापुढे तिला काही केल्या दिसेना.

ती मोत्ये घेण्याकरिता तिने हात पसरला. इतक्यात तो पाणबुड्या म्हणाला, 'आम्हाला काय देणार तू' ?

त्या सर्वांच्या डोळ्यांत कसली तरी विलक्षण अतृप्ती थैमान घालत होती !

तिला भतीच शंका आली. ती रागाने ओरडली, 'चालते व्हा इथनं'.

पाणबुड्यांच्या त्या पुढाऱ्याला आपली चूक कळून आली. तिच्यापुढे मोती करीत तो म्हणाला, 'आम्ही सारे भाऊ आहोत तुझे. भाऊबिजेची ओवाळणी म्हणून तुला हे मोती आम्ही देणार आहोत'!

तिने त्या मोत्यांना भीत भीत हात लावला. त्यांतले चारपाच ती उचलून घेणार इतक्यात तो पुढारी म्हणला, 'भावाला जेवायला वाढल्यावाचून बहिणीला ओवाळणी मिळत नाही'!

ती दचकून मागे झाली. एखाद्या वेड्या माणसाप्रमाणे शून्य दृष्टीने पाहात ती किंचाळली, 'चला, चालते व्हा इथनं! एकच भाकरी आहे माझ्या घरात. माझ्या पोरांना हवी ती !'

***

पाणबुडे तिथून निघाले. ते गावात आले, घरोघर फिरले. पण मूठ मूठभर मोती घेऊनसुद्धा भाकरी देणारा मनुष्य त्यांना भेटला नाही !

सर्वत्र एकच देखावा दिसत होता.

अस्थिपंजर झालेली माणसे !

आणि भुकेने व्याकुळ झालेले त्या माणसांचे निस्तेज डोळे !

झोपडीत, घरात, मंदिरात सुखाच्या सर्व वस्तू होत्या. फक्त एकच गोष्ट नव्हती- अन्न !

चालून चालून पाणबुड्यांचे पाय गळून गेले होते. तोंड फुलून आले होते. डोक्यावरल्या मोत्यांचे ओझेही असह्य झाले होते त्यांना आता !

***

एका देवळात देवापुढे हात जोडून बसलेल्या संन्याशाला त्यांनी



Scanned with OKEN Scanner

विचारले, 'जगातलं सारं अन्न गेलं कुठे ?'

'अन्न आलंच नाही, मग जाणार कुठं' ?

'आलंच नाही' ?

'येणार कुठून ? मृगाचा पाऊस नाही, मघाचा पाऊस नाही, हस्ताचा पाऊस नाही. फक्त स्वातीचा पाऊस पडला. त्या पावसाचा पोटाला काय उपयोग ? त्यानं फक्त मोती पिकतात'!

त्यांच्या डोक्यावरल्या हाऱ्यांकडे पाहात संन्याशी म्हणाला, 'अन्न घेऊन आलाय् वाटतं तुम्ही ? द्या, काही तरी द्या मला ! शिळ्या भाकरीचा, उष्ट्या भाकरीचा, कसलाही तुकडा द्या.'

संन्याशी त्यांचे पाय धरू लागला.

सारे पाणबुडे वेड्यासारखे समुद्राकडे धावत गेले. ते सारे मोत्यांचे हारे त्यांनी समुद्रात ओतले. एकही मोती त्यांनी बाहेर ठेवले नाही.

सर्वांनी हात जोडून वरुणदेवतेची प्रार्थना केली. 'देवा, मृगाचा पाऊस पडू दे, मघाचा पाऊस पडू दे. हस्ताचा पाऊस पडू दे. स्वातीचा पडला नाही तरी चालेल.'

**(कलिका)**

★★★



Scanned with OKEN Scanner